जानेवारी २००८

# पतसंस्थांनी थकबाकी वसुलीसाठी आखावयाचा कार्यक्रम

३१ मार्च २००८ ही तारीख दोन महिन्यांवर येवून ठेपलेली आहे. राज्यामध्ये थकबाकीदारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नियमित कर्ज वसुली होणारी कर्जाची खातीसुध्दा थकीत व्हावी यासाठी काही प्रवृत्ती सरसावलेल्या दिसतात. थकीत कर्जाची **थकबाकी वसुली करणे कामी शासन व शासनाचे संबंधित अधिकारी हवी असलेली कायदेशीर मदत सुध्दा करण्यासाठी पुढे येत नाहीत.** एवढेच नव्हे तर परिपत्रके, भाषणे, चर्चा, आदेश आणि वर्तमान पत्रांच्या बातम्या या व्यतिरिक्त **सरकार म्हणून थकबाकी वसुलीसाठी कुठेही पुढे आलेले दिसत नाहीत.** सभांमधून किंवा शिष्टमंडळाला खुष करण्यासाठी जे भाष्य केले जाते ते कायद्याच्या चौकटीत आहे किंवा नाही व जर असेल तर संबंधित यंत्रणा या कामाची अंमलबजावणी करते किंवा नाही याची खात्री करण्याची मानसिकता कोणाचीही नाही. त्यामुळे पतसंस्थांमध्ये थकबाकी वसुली करणेसाठी नैराश्य आले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

परंतू पतसंस्थांनी या परिस्थितीत घाबरुन जाण्याचे मुळीच कारण नाही. आणि कोणावर अवलंबून राहण्याची सुध्दा गरज नाही. आपण प्रत्येकाने आपल्या **पतसंस्थेचा उपविधी व सहकार कायदा याचा पूर्णपणे उपयोग करुन झालेल्या थकबाकीची १०० टक्के वसुली होवू शकते** हे प्रत्यक्ष वाचन केल्या नंतरच समजू शकते. सहकार कायद्याचा आधार घेवून त्याच्या आधारे थकबाकी वसुल करण्याच्या अनुषंगाने लागू होणारे इतर सर्व कायदे यांची सुध्दा मदत होवू शकते. ज्यामध्ये **कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, सिव्हील प्रोसिसर कोड, इंडियन पिनल कोड, लिमिटेशन ॲक्ट, कंपनी ॲक्ट, कामगार कायदा, किमान वेतन कायदा, निगोशिएबल इन्स्टूमेंट ॲक्ट, माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ इत्यादी** कायद्यांचा आधार घेणे आवश्यक आहे. या संबंधित कायद्याची पुस्तके पतसंस्थांनी आपल्या संग्रही ठेवणे आवश्यक आहे. आणि ज्यांना हे शक्य नाही त्यांची **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई, ११२ सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट, चिराग नगर पोलीस स्टेशनसमोर, लालबहादूर शास्त्री मार्ग, घाटकोपर (प), मुंबई - ४०० ०८६** या पत्यावर या संदर्भात रोज सकाळी ११.०० ते ६.०० या वेळेच्या दरम्यान त्यांना निश्चितपणे मार्गदर्शन मिळू शकेल.

आता हे आर्थिक वर्ष संपायला २ महिने शिल्लक राहिल्यामुळे खालील काही महत्वाच्या गोष्टी अग्रक्रमाने करण्यासाठी सुरुवात केली पाहिजे. प्रत्येक संस्थेकडे अधिकारी व कर्मचारी तसेच किमान १५ संचालक असतात. थकबाकीदारांची आणि त्यांच्या जामीनदारांची सर्व संपूर्ण नावे, घरचा - कामाचा - गावचा पत्ता व वसुल करावयाची एकुण रक्कम इत्यादी महत्वाचा तपशिल पतसंस्थेने प्रत्येकासाठी स्वतंत्र पानावर तयार करावा. पतसंस्थेच्या प्रत्येक संचालकावर किमान जबाबदारी सोपवून व त्याला सहज कमी वेळेत व काहीही खर्च न करता ह्या वसुलीसाठी प्रत्येकाशी संपर्क करता येईल, एवढ्यांचीच जबाबदारी देण्यात यावी. थकबाकीदारांकडून कायद्याच्या चौकटीत राहून थकीत रकमेची वसुली करणे या पध्दतीने कामाचे वाटप झाले पाहिजे. त्यामुळे **फक्त काही थकबाकीदारांवरच कारवाई करावयाची आणि कामकाजात कुठेही एकसुत्रीपणा ठेवायचा नाही, याकडे आपला कल जाणार**

**नाही.**प्रत्येकास थकबाकीदारांची स्वतंत्र जबाबदारी दिली तर निश्चित स्वरुपाचे परिणाम प्राप्त होतील. आणि त्याचा फायदा पतसंस्थेच्या थकबाकी वसुलीसाठी होईल.

ज्या थकबाकीदारांची कलम ९१ किंवा १०१ खाली वसुली दाखले संस्थेकडे उपलब्ध आहेत. व ते ज्या स्थितीमध्ये आहेत, त्याची अंमलबजावणी कायद्याप्रमाणे ताबडतोब करण्यास सुरुवात केली पाहिजे. काही वेळा केवळ वसुली दाखले पतसंस्थेच्या हातात किंवा एस.आर.ओ. (विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी) यांच्या केवळ नोटीसा संबंधितांना पाठविल्या जातात. परंतू पुढील कारवाई मात्र कालावधी संपल्यानंतरही होत नाही. तसेच जप्ती केल्यानंतर त्या पुढील कारवाई होत नाही. अशा अनेक गोष्टी केवळ अनावधनाने किंवा अज्ञानामुळे होवू शकतात. आणि ते ह्या ठिकाणी टाळले पाहिजे. शिवाय ज्यांचे तीन हप्त्यांपेक्षा जादा रकमा थकल्या, त्या १०० टक्के थकीत कर्जदारांवर कलम १०१ अंतर्गत ७ दिवसांचे आत दावे दाखल करावेत. आणि याचा सुध्दा परिणाम संबंधित निबंधकाच्या माध्यमातून पहिल्या सुनावणीची तारीख मिळल्यानंतर देखील थकबाकी वसुलीसाठी होवू शकतो. असा आमचा अनुभव आहे. त्यामुळे या राहिलेल्या दोन महिन्यात कामाचे वाटप व काही शुल्लक गोष्टी यामध्ये योग्य नियोजन, प्रत्येकाने रोज किमान ४ ते ५ तास काम नियमितपणे केले व थकबाकी वसुलीसाठी कोणाचा अपवाद न करता सरसकट केले तर, थकीत रकमेची वसुली बऱ्यापैकी होवू शकते. व त्याचा प्रत्यंतर आपल्याला बघावयास मिळेल. त्यामुळे या आर्थिक वर्षाची करावयाची एन.पी.ए. ची तरतूदही कमी होवून नफ्यात वाढ होवू शकेल. व सभासदांना जास्त लाभांश देता येईल. आणि त्याचा परिणाम सभासद व ठेवीदारांच्या हक्काच्या व आर्थिक संवर्धनासाठी होवू शकेल. व सभासदांना जास्त लाभांश देता येईल. आणि त्याचा परिणाम सभासद व ठेवीदारांच्या हक्काच्या व आर्थिक संवर्धनासाठी होवू शकेल. आणि संस्थेचे कर्मचारी व संचालक यांना सुध्दा आपल्या पतसंस्थेत आणखी लोकाभिमुख करणेसाठी एक मजबूत पाया उभा रहाण्यासाठी मदत होवू शकेल. आणि एप्रिल २००८ पासून वाटलेले कर्ज व वसुल करावयाची पध्दत प्रत्येक कर्जासाठी त्याचवेळी निश्चित करण्याचे धोरण येथून पुढे स्विकारण्यात यावे. त्यामुळे आर्थिक वर्षात संचालकांना अगोदर जो आटापिटा करावयास लागतो, ते करण्याचे कारण शिल्लक राहणार नाही. **कर्जदारांकडून मंजूर कर्जाचे वितरण करणे अगोदर कर्ज हप्त्याचे धनादेश घेतल्याशिवाय लेखी व कायद्याने करार केल्याशिवाय एकाही रुपयाचे कर्ज वितरण करु नये.** आणि एक हप्ता जरी थकला तरी त्यांनी दिलेला धनादेश दुसऱ्या दिवशी वटविणेसाठी बँकेत टाकणे ही सवय पतसंस्थांनी लावली पाहिजे. आणि धनादेश परत आला तर कलम १३८ खाली त्वरीत नोटीस वेळेवर दिली पाहिजे. व नोटीस देवूनही रक्कम वसूल झाली नाही तर, कोर्टामध्ये दावा दाखल केला पाहिजे. पतसंस्थांना याबाबत विशेष करुन कळविण्यात येते की, **जेवढ्या हप्त्यांमध्ये कर्ज मंजूर केले जाते, तेवढे धनादेश संबंधित कर्जदाराकडून घेण्यात यावे. कमी धनादेश घेवू नयेत.** शिवाय ज्या बँकेचे धनादेश कर्जदार पतसंस्थेस देतो, त्या बँकेला पतसंस्था व **कर्जदाराने सदरहू खाते बंद करणार नाही व स्टॉप पेमेंट** करणार नाही, असे एकत्रीत व स्वतंत्र पत्रे त्या बँकेस देवून पोच घ्यावी. व ती पत्रे संस्थेच्या दप्तरी त्या कर्ज फाईलमध्ये सुरक्षित ठेवण्यात यावी. पुढील तारखांचे धनादेश घेणेपुर्वी कायदेशिररीत्या सदरहू धनादेश कुठल्या कारणासाठी घेतले व त्याचा उपयोग कोणत्या कारणासाठी करणार आहे, त्याचा करारनामा व संमती पत्र कर्जदाराकडून घेणे आवश्यक आहे, व याकडे प्रत्येकाने

लक्ष देण्याची गरज आहे.

नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत असताना सर्व पतसंस्थांना पुन्हा एकदा जाहीर आवाहन करण्यात येते की, **कुठल्याही पतसंस्थेने जाहिराती देणे, देणगी देणे, वस्तु, बक्षीसे देणे, किंवा अन्य कारणासाठी रकमा खर्च करणे हे १०० टक्के थांबवावे व** पतसंस्थेचा मुळ आधार हा विस्तृत करावा. **कोणाचाही वाढदिवस, व इतर कार्यक्रमांना पतसंस्थेमधून रोख/ धनादेशाद्वारे एक नया पैसा देखील खर्च करु नये** हे जाणीवपूर्वक आवाहन करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**